# प्रेसनोट दिनांक १२/०३/२०१९

---

## तृतीय पंथीयाचे खुनाचा गुन्हा बारा तासाचे आत गुन्हे शाखा युनिट - ३ ने उघड करुन आरोपीस जेरबंद केले.

---

दि.११/०३/२०१९ रोजी सकाळी १०/४५ वा.चे पुर्वी हांडेवाडी रोडवरिल हिताशा सोसायटीच्या शेजारी सदाशिवनगर येथील पिंपळे बिल्डींगचे दुसरे मजल्यावर पुणे येथे अरबाज शेख ऊर्फ नजफ वय २१ रा. ससाणेनगर हडपसर पुणे या तृतीय पंथीयाचा अज्ञात आरोपीने अज्ञात कारणावरुन गळयावर धारदार हत्याराने वार करुन त्याचा निर्घृन खुन केला असून त्याबाबत सहाय्यक पोलीस फौजदार रमेश महादेव भोसले वानवडी पो.स्टे पुणे यांनी तक्रार दिलेवरुन वानवडी पोलीस स्टेशन गु.र.नं.१३७/२०१९ भा.दं.वि.कलम ३०२ प्रमाणे गुन्हा दाखल आहे.

सदर गुन्हयाचा समांतर तपास गुन्हे शाखा युनिट-३ पुणे येथील पोलीस करत असताना पोलीस नाईक विल्सन डिसोझा यांना त्यांचे बातमीदारा मार्फत बातमी मिळाली की, सदर खुनाचा गुन्हा अरबाज अहमद शेख रा. लक्ष्मीनगर येरवडा पुणे याने केला असून तो जोशी वडेवाले लक्ष्मीनगर येरवडा पुणे या ठिकाणी येणार आहे. अशी माहिती मिळाल्यावरुन त्यास सापळा रचून दि ११/०३/२०१९ रोजी ताब्यात घेण्यात आलेले आहे. त्याचेकडे प्राथमिक तपास करता त्याने सांगितले की, अरबाज शेख ऊर्फ नजफ याने मला " तु तेरी फ्रेंडको छोड दे. मेरे को छोडा तो तेरेको बदनाम करुंगी. तेरे घरके आगे जलाके लुंगी, मिडीया बुलाऊंगी " अशी धमकी दिली व मला वारंवार टॉर्चर केल्याने मी चिडून त्याचे गळयावर ठिकठिकाणी सुरीने वार करुन त्याचा खुन केला आहे. अशी कबुली दिली आहे त्यास गुन्हे शाखा येथील पोलीसांनी वानवडी पोलीस स्टेशन पुणे यांचे ताब्यात पुढील कार्यवाहीकरीता दिले आहे. अशा प्रकारे गुन्हे शाखा युनिट-३, चे पोलीसांनी गुन्हयातील अज्ञात आरोपीचा शोध घेऊन त्यास तात्काळ ताब्यात घेऊन बारा तासाचे आत सदर गुन्हा उघडकिस आणलेला आहे.

सदरची कामगिरी मा. अपर पोलीस आयुक्त गुन्हे श्री.प्रदिप देशपांडे, पोलीस उप-आयुक्त श्री.शिरीष सरदेशपांडे, सहाय्यक पोलीस आयुक्त गुन्हे शाखा -१ श्री.समीर शेख, यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा युनिट - ३ पुणे शहर चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक दिपक निकम, पोलीस उप निरीक्षक संजय गायकवाड अजय म्हेत्रे, किरण अडागळे पोलीस कर्मचारी सहायक पोलीसफौजदार दत्तात्रय गरुड, पोहवा/मच्छिंद्र वाळके, संतोष क्षिरसागर, गजानन गाणबोटे, विल्सन डिसोझा, सचिन गायकवाड यांचे पथकाने केली आहे.